# करिंथकरांस पहिले पत्र

१ देवाच्या इच्छेने ख्रिस्त येशूचा प्रेषित होण्यास बोलावलेला पौल, आणि बंधू सोस्थेनेस ह्यांजकडून;

२ख्रिस्त येशूत पवित्र केलेल्या, आणि जे प्रत्येक ठिकाणी आपला प्रभू, म्हणजे त्यांचा आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने धावा करतात, अशा सर्वांबरोबर पवित्र जन होण्यास बोलावलेल्या, करिंथ येथील देवाच्या मंडळीस:

३देव आपला पिता, आणि आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्यांजकडून तुम्हाला कृपा व शांती.

४तुम्हाला ख्रिस्त येशूत पुरविलेल्या, देवाच्या कृपेबद्दल मी सतत तुमच्यासाठी माझ्या देवाचे उपकार मानतो. ५-६कारण तुमच्यात ख्रिस्ताची साक्ष जशी दृढमूल झाली, तसे तुम्ही त्याच्या द्वारे सर्व बोलण्यात व सर्व ज्ञानात प्रत्येक प्रकारे संपन्न झाला आहात. ७त्यामुळे तुम्ही आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या प्रगट होण्याची प्रतीक्षा करीत असता कोणत्याही कृपादानात कमी असू नये. ८आणि त्याचप्रमाणे तो तुम्हाला शेवटपर्यंत सुस्थिर करील, म्हणजे आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या दिवशी तुम्ही निर्दोष ठरावे. ९देव विश्वासू आहे आणि त्याने तुम्हाला त्याचा पुत्र व आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या भागीत बोलावले आहे.

१०आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने मी तुम्हाला, बंधूंनो, विनंती करतो की, तुम्ही सर्व जण एकच बोला आणि तुमच्यात विभाग नसावेत. पण तुम्ही एकमेकांशी, एकमनाने व एकमताने पूर्णपणे जोडले जावे. ११कारण, माझ्या बंधूंनो, तुमच्यात कलह आहेत असे ख्लोवेच्या घराण्याकडून मला तुमच्याविषयी सांगण्यात आले आहे. १२माझे म्हणणे हे आहे की, तुमच्यातील प्रत्येक जण म्हणतो, 'मी पौलाचा आहे', 'मी अपुल्लोचा आहे', 'मी केफाचा आहे', आणि 'मी ख्रिस्ताचा आहे'.

१३ख्रिस्ताचे विभाग झालेत काय? तुमच्यासाठी पौल वधस्तंभावर खिळला गेला काय? किंवा पौलाच्या नावात तुमचा बाप्तिस्मा झाला काय? १४मी तुमच्यातील क्रिस्पस व गायस ह्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाचाच बाप्तिस्मा केला नाही, म्हणून मी देवाचे उपकार मानतो. १५नाहीतर, कोणी असे म्हणेल की, मी माझ्याच नावाने बाप्तिस्मा केला. १६आणि मी स्तेफनाच्या घराण्याचाही बाप्तिस्मा केला; ह्यांच्याशिवाय मी आणखी कोणाचा बाप्तिस्मा केला काय, हे मला माहीत नाही. १७कारण ख्रिस्ताने मला बाप्तिस्मा करण्यास पाठविले नाही, पण सुवार्ता सांगण्यास पाठविले आहे; पण शाब्दिक ज्ञानीपणाने नाही; नाहीतर, ख्रिस्ताचा वधस्तंभ निरर्थक केला जाईल.

१८कारण ज्यांचा नाश होत आहे त्यांना वधस्तंभाचा संदेश मूर्खपण आहे; पण ज्यांचे तारण होत आहे त्या आपल्यासाठी तो देवाचे सामर्थ्य आहे.

१९कारण असे लिहिले आहे की, 'मी ज्ञान्यांचे ज्ञानीपण नष्ट करीन, आणि बुद्धिवानांची बुद्धी नाहीशी करीन.' २०ह्या युगातला ज्ञानी कुठे आहे, शास्त्री कुठे आहे, वादविवादी कुठे आहे? ह्या जगाचे ज्ञानीपण देवाने मूर्खपण ठरविले की नाही? २१कारण देवाच्या ज्ञानीपणात, जगाने देवाला ज्ञानीपणाने ओळखले नाही. म्हणून देवाला हे बरे वाटले की, घोषणा करण्याच्या मूर्खपणाद्वारे जे विश्वास ठेवतात त्यांचे तारण व्हावे.

२२कारण यहुदी चिन्ह मागतात व हेल्लेणी ज्ञानीपणाच्या मागे लागतात. २३पण, आम्ही तर वधस्तंभावर खिळलेला ख्रिस्त गाजवितो. तो यहुद्यांना अडथळा व हेल्लेण्यांना मूर्खपण आहे; २४पण दोहोंतल्या बोलावलेल्यांस, यहुद्यांस आणि हेल्लेण्यांस, ख्रिस्त देवाचे सामर्थ्य व देवाचे ज्ञानीपण आहे; २५कारण देवाचे मूर्खपण मनुष्यांपेक्षा बुद्धिवान आहे; आणि देवाचे अशक्तपण मनुष्यांपेक्षा बलवान आहे.

२६कारण बंधूंनो, तुमचे पाचारण पहा; दैहिक दृष्ट्या तुमच्यात ज्ञानी पुष्कळ नाहीत, पराक्रमी पुष्कळ नाहीत, कुलवंत पुष्कळ नाहीत. २७पण ज्ञान्यांना लज्जित करण्यास देवाने जगातल्या मूर्ख गोष्टी निवडल्या, आणि बलिष्ठांना लज्जित करण्यास देवाने जगातल्या दुर्बळ गोष्टी निवडल्या; २८आणि आहेत त्या गोष्टी निरुपयोगी करण्यास देवाने जगातल्या हलक्या गोष्टी, उपेक्षित गोष्टी आणि काहीच

नाहीत अशा गोष्टी निवडल्या; २९म्हणजे देवासमोर कोणीही मनुष्याने अभिमान मिरवू नये.

३०त्याच्यामुळे तुम्ही ख्रिस्त येशूत आहा; आणि देवाकडून तो आपल्यासाठी ज्ञानीपण व नीतिमत्व, आणि पवित्रीकरण व मुक्ती असा केला गेला आहे. ३१म्हणजे शास्त्रलेखात लिहिल्याप्रमाणे, 'जो कोणी अभिमान मिरवतो त्याने प्रभूविषयी अभिमान मिरवावा.'

## २

आणि बंधूंनो, मी तुमच्याकडे आलो तेव्हा तुम्हाला भाषेच्या किंवा ज्ञानीपणाच्या श्रेष्ठतेने देवाच्या साक्षीची घोषणा करीत आलो नाही. २कारण मी ठरवले होते की, मी तुमच्यात येशू ख्रिस्ताशिवाय, आणि वधस्तंभावर खिळलेल्या येशू ख्रिस्ताशिवाय दुसरे काहीही मानू नये.

३आणि मी अशक्तपणात, भय धरून, फार कापत कापत तुमच्यात आलो. ४पण माझे बोलणे व घोषणा करणे भुरळ घालणाऱ्या ज्ञानीपणाच्या शब्दांत नव्हते, पण आत्म्याच्या व सामर्थ्याच्या निदर्शनात होते. ५म्हणजे तुमचा विश्वास मनुष्यांच्या ज्ञानीपणावर उभारलेला नसावा तर देवाच्या सामर्थ्यावर उभारलेला असावा.

६तरी पण जे प्रौढ आहेत त्यांना आम्ही ज्ञानीपण सांगतो. पण ते ह्या युगाचे ज्ञानीपण नाही, किंवा ह्या युगाच्या नष्ट होणाऱ्या अधिपतींचेही नाही, ७तर जे आपल्या गौरवासाठी देवाने युगांपूर्वी पूर्वनियोजित केले होते, त्या गुप्त रहस्यातील देवाचे ज्ञानीपण आम्ही सांगतो. ८ते ह्या युगाच्या अधिपतींमधील कोणालाही कळले नव्हते, कारण त्यांना ते कळले असते, तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळले नसते.

९पण शास्त्रलेखात लिहिल्याप्रमाणे, 'देवाने त्याच्यावर प्रीती करणाऱ्यांसाठी ज्या गोष्टी सिद्ध केल्या आहेत, त्या डोळ्याने बघितलेल्या नाहीत, किंवा कानाने ऐकलेल्या नाहीत, किंवा मनुष्यांच्या मनांत आलेल्या नाहीत'; १०पण देवाने त्याच्या आत्म्याच्या द्वारे त्या आपल्याला प्रकट केल्या आहेत. कारण आत्मा सर्व गोष्टी, हो, देवाच्या गूढ गोष्टीही, शोधून काढतो. ११कारण मनुष्यांत असा कोण आहे की, त्याच्यात राहणाऱ्या मनुष्याच्या आत्म्याशिवाय तो एखाद्या मनुष्याच्या गोष्टी जाणतो? त्याचप्रमाणे देवाच्या गोष्टी देवाच्या आत्म्याशिवाय कोणाला माहीत नाहीत.

१२आता आपल्याला जगाचा आत्मा मिळाला नसून देवाकडून आलेला आत्मा मिळाला आहे; म्हणजे देवाने आपल्याला ज्या गोष्टी दिल्या आहेत त्या आपल्याला कळाव्यात. १३आणि आम्ही ह्या गोष्टी सांगतो, पण मनुष्याच्या ज्ञानीपणाने शिकविलेल्या शब्दांत नाही, तर पवित्र आत्म्याने शिकविलेल्या शब्दांत आत्मिक गोष्टींची आत्मिक गोष्टींशी तुलना करून सांगतो.

१४कारण जीवधारी मनुष्य देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारीत नाही, कारण त्या त्याला मूर्खपण आहेत; तो त्या ओळखू शकत नाही, कारण आत्मिक दृष्ट्या त्यांची पारख करता येते; १५पण जो आत्मिक आहे तो सर्व गोष्टींची पारख करतो, तरी कोणीही मनुष्याकडून त्याची पारख केली जात नाही; १६कारण, 'परमेश्वराचे मन कोणी ओळखले आहे की, त्याने त्याला काही सुचवावे?' पण आपल्याला ख्रिस्ताचे मन आहे.

## ३

आणि बंधूंनो, मी आत्मिक मनुष्यांशी जसे बोलावे तसे तुमच्याशी बोलू शकलो नाही, तर मी दैहिक मनुष्यांशी, ख्रिस्तामधील बालकांशी जसे बोलावे, तसे तुमच्याशी बोलू शकलो. २मी तुम्हाला दूध दिले, जड अन्न नाही; कारण तुम्हाला आतापर्यंत शक्ती नव्हती, आणि तशीच, अजून तुम्हाला शक्ती नाही, ३पण तुम्ही अजून दैहिक आहा, कारण ज्याअर्थी तुमच्यात ईर्ष्या, कलह व फुटी आहेत त्याअर्थी तुम्ही अजून दैहिक आहा, आणि मनुष्यांसारखे चालत आहा असे नाही काय?

४कारण एक म्हणतो, 'मी पौलाचा आहे' आणि दुसरा म्हणतो, 'मी अपुल्लोचा आहे', तर तुम्ही दैहिक आहा असे नाही काय? ५मग अपुल्लो कोण आहे? आणि पौल कोण आहे? प्रत्येक जणाला प्रभूने दिल्याप्रमाणे, ज्यांच्या द्वारे तुम्ही विश्वास ठेवलात असे ते केवळ सेवक आहेत. ६मी लावले, अपुल्लोने पाणी घातले, पण देवाने वाढविले. ७तर मग, लावणारा काहीच नाही व पाणी घालणारा काहीच नाही, पण वाढविणारा देव आहे. ८आता लावणारा आणि पाणी घालणारा हे सारखेच आहेत आणि प्रत्येक जणाला, त्याच्या स्वतःच्या कामाप्रमाणे त्याचे स्वतःचे प्रतिफळ मिळेल.

९कारण आम्ही देवाचे सहकारी आहो, तुम्ही देवाचे शेत आहा, तुम्ही देवाचे बांधकाम आहा, १०मला पुरविलेल्या देवाच्या कृपेच्या परिमाणानुसार मी सुज्ञ,

प्रमुख बांधणाऱ्याप्रमाणे पाया घातलेला आहे; आणि दुसरा त्यावर बांधीत आहे; तर आपण त्यावर कसे बांधीत आहो ह्याची प्रत्येक जणाने काळजी घ्यावी.

[११]कारण जो पाया घातलेला आहे, आणि तो ख्रिस्त येशू आहे, त्याच्याशिवाय दुसरा पाया कोणीही मनुष्य घालू शकणार नाही. [१२]आता कोणी जर ह्या पायावर सोने, रुपे, मोलवान पाषाण, लाकूड, गवत किंवा पेंढा घेऊन बांधील [१३]तर प्रत्येकाचे काम उघड होईल; कारण तो दिवस ते उघड करील, कारण ते अग्नीने प्रकट होईल, आणि प्रत्येक मनुष्याचे काम कसले आहे ते अग्नी पारखील. [१४]आणि जर कोणाचे त्यावर बांधलेले काम राहिले तर त्याला वेतन मिळेल. [१५]जर कोणाचे काम जळाले तर त्याची हानी होईल, मग जणू अग्नीतून वाचविल्याप्रमाणे तो स्वतः वाचविला जाईल.

[१६]तुम्ही देवाचे मंदिर आहा, आणि देवाचा आत्मा तुमच्यात वास करतो हे तुम्ही जाणत नाही काय? [१७]जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करील तर देव त्याचा नाश करील, कारण देवाचे मंदिर पवित्र आहे आणि ते तुम्ही आहा.

[१८]कोणी स्वतःला फसवू नये. आपण ह्या युगात ज्ञानी आहोत असे तुमच्यातील कोणाला वाटत असेल, तर त्याने ज्ञानी होण्यास मूर्ख व्हावे. [१९]कारण ह्या जगाचे ज्ञानीपण देवापुढे मूर्खपण आहे. कारण असे लिहिले आहे की, 'तो ज्ञान्यांना त्यांच्या धूर्तपणात धरतो'. [२०]आणि पुन्हा, 'परमेश्वर ज्ञान्यांचे विचार जाणतो की, ते व्यर्थ आहेत'.

[२१]म्हणून कोणीही मनुष्यांविषयी अभिमान मिरवू नये; कारण सर्व गोष्टी तुमच्या आहेत. [२२]पौल, किंवा अपुल्लो, किंवा केफा, किंवा जग, किंवा जीवन, किंवा मरण, आताच्या गोष्टी किंवा येणाऱ्या गोष्टी, हे सर्व तुमचे आहे; आणि तुम्ही ख्रिस्ताचे आहा व ख्रिस्त देवाचा आहे.

४ कारण आम्ही ख्रिस्ताचे सेवक व देवाच्या रहस्याचे कारभारी आहोत, असेच कोणीही आम्हाला गणले पाहिजे. [२]शिवाय, मनुष्य विश्वासू आढळला पाहिजे हे कारभाऱ्यांत आवश्यक आहे. [३]पण तुमच्याकडून, किंवा मनुष्याच्या दिवशी माझी चौकशी केली जावी ही मला एक क्षुल्लक गोष्ट आहे; हो, मी माझी चौकशी करीत नाही, [४]कारण माझ्याविरुद्ध मला काही माहीत नाही. तरी त्यामुळे मी दोषी ठरत नाही; पण माझी चौकशी करणारा प्रभू आहे.

[५]म्हणून तुम्ही त्या काळापूर्वी, प्रभू येईपर्यंत कशाचा न्याय करू नका; तो अंधारातल्या गुप्त गोष्टी प्रकाशात आणील, आणि मनातले विचार प्रगट करील तेव्हा प्रत्येक मनुष्याची देवाकडून प्रशंसा होईल. [६]आणि बंधूंनो, तुमच्याकरता मी ह्या गोष्टी मला आणि अपुल्लोला उपमेने लागू केल्या आहेत. म्हणजे तुम्ही आमच्यापासून शिकावे की, जे काही लिहिलेले आहे त्यापेक्षा मनुष्यांना अधिक मानू नये, म्हणजे तुमच्यात कोणीही एकाकरता दुसऱ्यावर फुगू नये. [७]कारण तुला वेगळे कोणी केले? आणि तुला मिळाले नाही असे तुझ्याजवळ काय आहे? मग तुला मिळाले असता, जणू तुला मिळाले नाही, असा अभिमान तू का मिरवतोस? [८]तुम्ही इतक्यात तृप्त झालात? तुम्ही इतक्यात संपन्न झालात? तुम्ही आमच्याशिवाय राजे झालात? आणि तुम्ही राज्य चालवावे अशी, खरोखर, मी इच्छा करीन म्हणजे आम्हीही तुमच्याबरोबर राज्य चालवू.

[९]कारण मला असे वाटते की, देवाने जणू आम्हा प्रेषितांना मरणासाठी नेमलेल्यांसारखे शेवटी पुढे आणले आहे. कारण आम्ही जगाला, देवदूतांना व मनुष्यांना, जणू तमाशा झालो आहो. [१०]आम्ही ख्रिस्ताकरता मूर्ख, पण तुम्ही ख्रिस्तात शहाणे आहात; आम्ही दुर्बळ, पण तुम्ही बलवान आहात; तुम्ही प्रतिष्ठित, पण आम्ही अवमानित झालो आहोत. [११]आम्ही ह्या घटकेपर्यंत भुकेले आहोत, तान्हेले आहोत आणि उघडे आहोत. आम्हाला बुक्क्या मारल्या जात आहेत आणि आम्हाला आमचे ठिकाण नाही. [१२]आम्ही आमच्या हातांनी काम करून कष्ट करतो; आमची हेटाळणी होत असता आम्ही आशीर्वाद देतो; छळ होत असता सहन करतो; [१३]निंदा होत असता आम्ही विनंती करतो; आम्ही आतापर्यंत जगाची घाण व सगळ्या गोष्टींची खरवड झालो आहो.

[१४]मी तुम्हाला लाजवावे म्हणून हे लिहीत नाही, पण माझ्या प्रिय मुलांप्रमाणे तुम्हाला बोध करावा म्हणून लिहितो. [१५]कारण जरी ख्रिस्तात तुम्हाला दहा हजार शिक्षक असले तरी पुष्कळ बाप नाहीत; कारण मी सुवार्तेद्वारे तुम्हाला ख्रिस्त येशूत जन्म दिला आहे. [१६]म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की, माझे अनुकरण

करणारे व्हा. [१७]म्हणून मी तिमथ्याला तुमच्याकडे धाडले
आहे; तो प्रभूमध्ये माझा प्रिय आणि विश्वासू मुलगा
आहे, आणि, ख्रिस्त येशूतील ज्या माझ्या पद्धती मी
प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक मंडळीत शिकवीत असतो त्यांची
तुम्हाला तो आठवण देईल.
[१८]मी जणू तुमच्याकडे येणार नसेन म्हणून कित्येक
जण फुगलेत. [१९]पण प्रभूची इच्छा असेल तर मी लवकरच
तुमच्याकडे येईन, आणि जे फुगलेत त्यांचे बोलणे नाही,
पण त्यांचे सामर्थ्य मला कळेल. [२०]कारण देवाचे राज्य
शब्दात नाही पण सामर्थ्यात आहे. [२१]तुमची काय इच्छा
आहे? मी तुमच्याकडे काठी घेऊन येऊ, किंवा प्रीतीने व
सौम्यतेच्या आत्म्याने येऊ?

५ खरोखर, तुमच्यात जारकर्म आहे असे
ऐकण्यात येत आहे. आणि कोणी आपल्या बापाची
बायको घ्यावी, असे जारकर्म परजनांतदेखील आढळत
नाही. [२]पण तुम्ही फुगला आहात, आणि उलट ही गोष्ट
करणारा आपल्यामधून काढला जावा म्हणून तुम्ही शोक
केला नाही.
[३]कारण मी शरिराने दूर असलो तरी आत्म्याने जवळ
असल्यामुळे, मी जवळ असल्याप्रमाणे, अशी ही गोष्ट
करणाऱ्याचा, खरोखर, आधीच न्याय केला आहे: [४]तुम्ही
जेव्हा प्रभू येशू ह्याच्या नावाने एकत्र जमाल आणि माझा
आत्मा तुमच्याबरोबर असेल तेव्हा आपला प्रभू येशू
ह्याच्या सामर्थ्याने, [५]तुम्ही अशा माणसाला देहाच्या
नाशाकरता सैतानाच्या स्वाधीन करावे; म्हणजे, प्रभूच्या
दिवशी आत्म्याचे तारण व्हावे.
[६]तुमचा अभिमान चांगला नाही. थोडेसे खमीर
सगळा गोळा फुगवते, हे तुम्ही जाणता ना? [७]म्हणून तुम्ही
जुने खमीर साफ काढा, म्हणजे तुम्ही बेखमीर आहात
त्याप्रमाणे तुम्ही एक नवा गोळा व्हावे; कारण आपला
वल्हांडणाचा बळी ख्रिस्त मारला गेला आहे. [८]तर आपण
जुन्या खमिराने, किंवा कुवृत्तीच्या व कुकर्माच्या खमिराने
नाही, पण शुद्ध भावाच्या व खरेपणाच्या बेखमीर भाकरीने
सण पाळू या.
[९]मी तुम्हाला माझ्या पत्रात लिहिले होते की,
जारकर्म्यांशी संबंध ठेवू नका. [१०]पण जगातले जारकर्मी,
लोभी, लुबाडणारे किंवा मूर्तिपूजक असे मुळीच नाही;
कारण मग तुम्हाला जगातून बाहेर जावे लागेल. [११]पण
आता, मी तुम्हाला लिहिले आहे की, बंधू म्हटलेला कोणी
मनुष्य जर जारकर्मी, लोभी, किंवा मूर्तिपूजक, निंदक,
पिणारा किंवा लुबाडणारा असेल तर त्याच्याशी संबंध ठेवू
नका; अशा माणसांबरोबर जेवूही नका. [१२]कारण
बाहेरच्यांचा न्याय करण्याशी माझा काय संबंध? [१३]पण
देव बाहेरच्यांचा न्याय करतो म्हणून तुम्ही आपल्यामधून
त्या दुष्ट माणसाला बाहेर काढा.

६ तुमच्यात कोणाची दुसऱ्या कोणाविरुद्ध काही
बाब असेल, तर पवित्र जनांपुढे जाण्याऐवजी तो
आपल्या न्यायनिवाड्यासाठी अनीतिमानांपुढे जाण्यास
धजेल काय? [२]पवित्र जन जगाचा न्याय करतील हे तुम्ही
जाणत नाही काय? आणि जर तुमच्याकडून जगाचा न्याय
होणार आहे, तर क्षुल्लक, लहान गोष्टींचा न्याय करण्यास
तुम्ही अपात्र आहा काय? [३]आपण देवदूतांचा न्याय करू,
हे तुम्ही जाणत नाही काय? मग ऐहिक जीवनातल्या
गोष्टींचा का नाही? [४]मग ऐहिक जीवनाच्या गोष्टींविषयी
तुमच्याजवळ खटले असल्यास जे मंडळीत काहीच न
मानलेले आहेत त्यांना करायला कसे बसवता? [५]तुम्हाला
लाजवावे म्हणून मी बोलतो, ज्याला बांधवांत निवाडा
करता येईल, असा एकही ज्ञानी मनुष्य तुमच्यात नाही, हे
खरे आहे काय? [६]पण बंधू बंधूला घेऊन
न्यायनिवाड्यासाठी जातो, आणि जे विश्वास ठेवणारे
नाहीत अशांच्यापुढे तो जातो. [७]तुम्ही एकमेकांवर खटले
चालवता, ह्यात तुमचीच सर्व प्रकारे हानी आहे; त्यापेक्षा
तुम्ही आपल्यावर अन्याय का होऊ देत नाही? त्यापेक्षा
तुम्ही आपली फसवणूक का होऊ देत नाही? [८]उलट तुम्ही
स्वतः अन्याय करता आणि फसवता, आणि तेही बंधूंना.
[९]अनीतिमानांस देवाचे राज्य वतन मिळणार नाही, हे
तुम्ही जाणत नाही काय? फसू नका; कोणीही जारकर्मी,
मूर्तिपूजक किंवा व्यभिचारी, विपरीत संभोग करू देणारे
किंवा विपरीत संभोग करणारे, [१०]चोर, लोभी किंवा
दारूबाज, निंदा करणारे किंवा लुबाडणारे, देवाच्या
राज्याचे वतन मिळवणार नाहीत. [११]आणि तुम्ही कित्येक
जण तसे होता; पण तुम्ही धुतले गेला आहा, तुम्ही पवित्र
केले गेला आहा, आणि, प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने व
आपल्या देवाच्या आत्म्याकडून तुम्ही नीतिमान ठरविले
गेला आहा.

१२**सर्व गोष्टींची मला मोकळीक** आहे, पण सर्व
गोष्टी हिताच्या नसतात; सर्व गोष्टींची मला मोकळीक
आहे, पण मी कोणत्याच गोष्टीच्या अधीन होणार नाही.
१३पोटाकरता खाद्ये आहेत आणि खाद्यांकरता पोट आहे;
पण देव ते व तीही नष्ट करील. जारकर्मासाठी शरीर नाही,
प्रभूसाठी आहे, आणि शरिरासाठी प्रभू आहे. १४देवाने
प्रभूला उठविले आहे, आणि तो आपल्या सामर्थ्याने
त्याचप्रमाणे आपल्याला उठवील. १५तुमची शरिरे
ख्रिस्ताचे अवयव आहेत, हेही तुम्ही जाणत नाही काय?
मग मी ख्रिस्ताचे अवयव घेऊन ते वेश्येचे अवयव करू
काय? तसे न होवो. १६किंवा तुम्ही हे जाणत नाही की, जो
वेश्येशी जोडला जातो तो तिच्याशी शरिराने एक होतो?
कारण तो म्हणतो की, दोघे एकदेह होतील. १७पण जो
प्रभूशी जोडला जातो तो त्याच्याशी आत्म्याने एक होतो.
१८जारकर्मापासून दूर पळा. जे दुसरे कोणतेही पाप मनुष्य
करतो ते त्याच्या शरिराबाहेर होते, पण जारकर्म करणारा
आपल्या स्वतःच्या शरिराविरुद्ध पाप करतो.

१९किंवा तुम्ही हे जाणत नाही की, तुमचे शरीर हे
देवाकडून तुमच्यात आलेल्या व तुमच्यात असलेल्या
पवित्र आत्म्याचे मंदिर आहे? आणि तुम्ही स्वतःचे
राहिला नाही? २०कारण तुम्हाला मोल देऊन विकत घेतले
आहे; म्हणून तुम्ही आपल्या शरिराने देवाचे गौरव करा.

७ आता तुम्ही मला लिहिलेल्या गोष्टींविषयी:
स्त्रीला न शिवणे हे पुरुषासाठी बरे आहे. २तरीही
जारकर्म चालते म्हणून प्रत्येक पुरुषाला आपली स्वतःची
पत्नी असावी आणि प्रत्येक स्त्रीला आपला स्वतःचा पती
असावा. ३पतीने पत्नीला तिचा हक्क द्यावा; आणि
त्याचप्रमाणे पत्नीनेही पतीला द्यावा. ४पत्नीला तिच्या
स्वतःच्या शरिरावर हक्क नसतो, पण पतीला असतो;
आणि त्याचप्रमाणे पतीलाही त्याच्या स्वतःच्या शरिरावर
हक्क नसतो, पण पत्नीला असतो. ५आपण प्रार्थनेत काळ
घालवावा म्हणून तुम्ही एकमेकांच्या संमतीने काही काळ
घेतल्याशिवाय एकमेकांचा हक्क हिरावू नका. आणि
पुन्हा एकत्र या. म्हणजे सैतानाने तुमच्या असंयमात तुमची
परीक्षा करू नये.

६पण मी हे संमती म्हणून सांगतो, आज्ञा म्हणून नाही.
७कारण माझी इच्छा आहे की, मी आहे तसे सर्वांनी व्हावे;
पण देवाकडून प्रत्येक मनुष्याला, एकाला ह्या प्रकारे व
दुसऱ्याला त्या प्रकारे, त्याचे विशिष्ट कृपादान मिळते.
८म्हणून मी सर्व अविवाहितांना, आणि विधवांना असे
म्हणतो की, तुम्ही माझ्याप्रमाणे राहिलात तर ते
तुमच्यासाठी बरे आहे. ९पण त्यांच्यात ते बळ नसेल तर
त्यांनी लग्न करावे; कारण जळण्यापेक्षा लग्न करणे बरे.

१०आणि विवाहितांना मी आज्ञा देत आहे, मी नाही
पण प्रभू देत आहे की, पत्नीने पतीला सोडू नये. ११पण,
जर तिने सोडले, तर लग्न न करता तसेच रहावे, किंवा
आपल्या पतीबरोबर समेट करावा, आणि पतीने पत्नीला
सोडू नये.

१२पण इतरांना हे प्रभू सांगत नाही, पण मी सांगतो
की, जर एखाद्या बंधूची पत्नी विश्वास ठेवणारी झाली
नसेल, आणि त्याच्याबरोबर राहण्यास तिची संमती
असेल तर त्याने तिला सोडू नये. १३आणि एखाद्या स्त्रीचा
पती विश्वास ठेवणारा झाला नसेल, आणि तिच्याबरोबर
राहण्यास त्याची संमती असेल तर तिने त्याला सोडू नये.
१४कारण, विश्वास न ठेवणारा पती पत्नीमुळे पवित्र होतो,
आणि विश्वास न ठेवणारी पत्नी पतीमुळे पवित्र होते.
नाहीतर, तुमची मुले अशुद्ध असती, पण ती आता पवित्र
आहेत. १५पण स्वतः विश्वास ठेवीत नसल्यामुळे कोणी
सोडून जात असेल तर जाऊ द्या; कारण, कोणी बंधू किंवा
भगिनी अशा बाबतीत बंधनात नाही. पण देवाने
आपल्याला शांतीत बोलावले आहे. १६कारण, तू, पत्नी,
हे कशावरून जाणतेस की, तू आपल्या पतीला तारशील
की नाही? किंवा तू, पती, हे कशावरून जाणतोस की, तू
आपल्या पत्नीला तारशील की नाही? १७तर जसे प्रभूने
प्रत्येकाला वाटून दिले आहे, जसे देवाने प्रत्येकाला
बोलावले आहे, तसे त्याने चालावे. आणि ह्याप्रमाणे, मी
सर्व मंडळ्यांना आज्ञा देत आहे.

१८सुनत झालेला कोण बोलावला गेला आहे? त्याने
बेसुनत होऊ नये. बेसुनत असलेला कोण बोलावला गेला
आहे? त्याने सुनत करून घेऊ नये. १९कारण सुनत
झालेला असणे काही नाही किंवा बेसुनत असणे काही
नाही; पण देवाच्या आज्ञांचे पालन करणे हे सर्व काही
आहे. २०ज्या पाचारणात जो बोलावला गेला असेल त्यात
त्याने रहावे.

२१तू दास असता बोलावला गेलास काय? त्याची
पर्वा करू नकोस; पण तुला स्वतंत्र होता आले तर त्याचा
उपयोग कर. २२कारण दास असता जो प्रभूत बोलावला
गेला तो प्रभूचा स्वतंत्र मनुष्य आहे; त्याचप्रमाणे जो

स्वतंत्र असता बोलावला गेला तो ख्रिस्ताचा दास आहे.
२३तुम्हाला मोल देऊन विकत घेतले आहे; तुम्ही
माणसाचे दास होऊ नका. २४बंधूंनो, जो ज्या स्थितीत
बोलावला गेला आहे त्याने त्या स्थितीत देवाबरोबर
रहावे.

२५आता कुमारिकांविषयी मला प्रभूकडून काही आज्ञा
नाही; पण, विश्वासू राहता येण्यास ज्याच्यावर प्रभूने दया
केली आहे असा मी एक असल्यामुळे मी माझे मत देतो.
२६म्हणून मला वाटते की, आताच्या आपत्तीत हे चांगले
आहे; म्हणजे जो ज्या स्थितीत असेल तसेच त्याने रहावे
हे त्याच्यासाठी चांगले आहे. २७तू बायकोला बांधलेला
आहेस? तू स्वतः सुटण्याचा प्रयत्न करू नकोस. तू
बायकोपासून सोडविला गेलास? तू बायको मिळवू पाहू
नकोस. २८पण तू जर लग्न केलेस तर तू पाप केले नाहीस;
आणि कुमारिकेने लग्न केले तर तिने पाप केले नाही; पण
अशांवर देहात संकट येईल, आणि मी तुम्हाला वाचवीत
आहे. २९पण बंधूंनो, मी हे सांगतो की, हा काळ थोडका
आहे. आता, ज्यांना बायका आहेत त्यांना बायका
नसल्यासारखे त्यांनी रहावे; ३०जे रडतात त्यांनी रडत
नसल्यासारखे, जे आनंद करतात त्यांनी आनंद करीत
नसल्यासारखे आणि जे विकत घेतात त्यांनी ते आपले
स्वतःचे नसल्यासारखे रहावे. ३१जे ह्या जगाचा उपयोग
करतात त्यांनी दुरुपयोग न करणारे व्हावे; कारण ह्या
जगाचे रूप सरत आहे.

३२पण तुम्ही निश्चिंत असावे अशी माझी इच्छा
आहे. जो अविवाहित आहे तो प्रभूच्या गोष्टींची, म्हणजे
आपण प्रभूला कसे संतुष्ट करावे ह्याची काळजी करतो;
३३पण जो विवाहित आहे तो जगातल्या गोष्टींची, म्हणजे
आपण पत्नीला कसे संतुष्ट करावे ह्याची काळजी करतो;
आणि त्याचे मन द्विधा होते. ३४आणि पत्नी व कुमारिका
ह्यांच्यातही फरक आहे; जी अविवाहित आहे ती आपण
शरिराने व आत्म्याने पवित्र रहावे म्हणून प्रभूच्या गोष्टींची
काळजी करते; पण जी विवाहित आहे ती जगातल्या
गोष्टींची, म्हणजे आपण पतीला कसे संतुष्ट करावे ह्याची
काळजी करते. ३५हे तुम्हाला हितकारक आहे म्हणून
सांगतो, तुमच्यावर बंधन टाकावे म्हणून नाही; पण शोभून
दिसणारे आहे ते, आणि तुम्ही विचलित न होता प्रभूची
सेवा करावी म्हणून सांगतो.

३६पण आपण आपल्या कुमारिकेशी अनुचितपणे
वागत आहो असे कोणाला वाटत असेल, जर तिचे वय
झालेले असेल आणि तशी आवश्यकता असेल, तर
त्याची इच्छा असेल तसे त्याने करावे. तो पाप करीत
नाही; त्यांना लग्न करू द्यावे. ३७पण जो मनुष्य अंतर्यामी
स्थिर आहे, ज्याला कशाची निकड नाही, पण ज्याची
इच्छेवर सत्ता आहे, आणि आपण आपल्या कुमारिकेचे
पालन करू असे ज्याने मनात ठरविले आहे तो चांगले
करतो. ३८म्हणून जो लग्न करून देतो तो चांगले करतो;
पण लग्न करून देत नाही तो अधिक चांगले करतो.

३९विवाहित स्त्रीचा पती जिवंत आहे तोवर ती
नियमाने बांधलेली आहे, पण जर तिचा पती मेला तर,
केवळ प्रभूमध्ये, तिची इच्छा असेल त्याच्याशी विवाहित
होण्यास ती स्वतंत्र आहे. ४०पण ती जर तशी राहील तर,
माझ्या मते, ती अधिक सुखी होईल. आणि मी मानतो
की, माझ्यातही देवाचा आत्मा आहे.

८ आता, मूर्तींना वाहिलेल्या गोष्टींविषयी
आपल्या सर्वांना ज्ञान आहे, हे आपण जाणतो. ज्ञान
फुगवते, पण प्रीती उभारणी करते. २आपण एखादी गोष्ट
जाणतो असे कोणाला वाटत असेल, तर ती जशी
समजली पाहिजे तशी अजून तो जाणत नाही. ३पण कोणी
देवावर प्रीती करीत असेल तर त्या मनुष्याला देव
ओळखतो.

४म्हणून आता, मूर्तींना वाहिलेल्या पदार्थांच्या
सेवनाविषयी: आपण जाणतो की, जगात मूर्ती ही काहीच
नाही, आणि एकाशिवाय दुसरा देव नाही, ५कारण
आकाशात आणि पृथ्वीवर देव म्हटलेले पुष्कळ असले,
कारण तसे पुष्कळ देव आणि पुष्कळ प्रभू असतील, ६तरी
आपल्याला, खरोखर, एक देव आहे; तो पिता आहे;
त्याच्याकडून सर्व झाले आहे, आणि आपण त्याच्यात
आहो; आणि ज्याच्यामुळे सर्व झाले तो एक प्रभू येशू
ख्रिस्त आपल्याला आहे, आणि त्याच्यामुळे आपण
आहो.

७पण हे ज्ञान प्रत्येक मनुष्याला असणार नाही,
कारण मूर्तीविषयी जे विवेक बाळगतात असे कित्येक
जण, ह्या घटकेपर्यंत, ते मूर्तीला वाहिलेले म्हणून खात
आहेत; आणि त्यांचा विवेक दुर्बळ असल्यामुळे दूषित
होतो. ८पण अन्न आपल्याला देवासमोर नेणार नाही;

आपण न खाण्याने कमी ठरत नाही, किंवा खाण्याने अधिक ठरत नाही.

[९]पण तुमचे हे स्वातंत्र्य दुर्बळ असलेल्यांस, कोणत्याही प्रकारे, अडखळण होऊ नये म्हणून काळजी घ्या. [१०]कारण ज्ञान असलेल्या तुला जर मूर्तीच्या मंदिरात भोजनास बसलेले कोणी बघितले, तर तो दुर्बळ असल्यास त्याचा विवेक मूर्तींना वाहिलेले पदार्थ खाण्यास तयार होईल ना? [११]आणि ज्याच्यासाठी ख्रिस्त मेला अशा दुर्बळ असलेल्या तुझ्या बंधूचा तुझ्या ज्ञानामुळे नाश होईल. [१२]पण तुम्ही जेव्हा अशा प्रकारे बंधूंविरुद्ध पाप करता आणि दुर्बळ असलेला त्यांचा विवेक तुम्ही दुखावता, तेव्हा तुम्ही ख्रिस्ताविरुद्ध पाप करता. [१३]म्हणून, जर माझ्या बंधूला अन्नाने अडथळा होत असेल तर माझ्या बंधूला अडथळा होण्यास मी कारणीभूत होऊ नये म्हणून मी कधीच मांस खाणार नाही.

९ मी स्वतंत्र नाही काय? मी प्रेषित नाही काय? मी आपल्या प्रभू येशूला पाहिले नाही काय? प्रभूच्या ठायी तुम्ही माझे काम आहा ना? [२]मी इतरांकरता प्रेषित नसलो, तरी निःसंशय मी तुमच्याकरता आहे. कारण, तुम्ही प्रभूमध्ये माझ्या प्रेषितपणाचा शिक्का आहा.

[३]माझी चौकशी करणाऱ्यांना हे माझे प्रत्युत्तर आहे. [४]आम्हाला खाण्यापिण्याचा हक्क नाही काय? [५]इतर प्रेषित, प्रभूचे भाऊ, किंवा केफा, हे करतात त्याप्रमाणे आम्हाला कोणी धर्मभगिनी, पत्नी करून घेऊन, बरोबर नेण्याचा हक्क नाही काय? [६]किंवा केवळ मला आणि बर्णबाला काम न करण्याचा हक्क नाही काय?

[७]कोण कधी स्वतःच्या खर्चाने शिपाईगिरी करतो काय? किंवा कोण द्राक्षमळा लावतो, आणि त्याचे फळ खात नाही? किंवा कोण कळप राखतो आणि कळपाच्या दुधातून खात नाही? [८]मी ह्या गोष्टी लोकरीतीस अनुसरून सांगतो काय? नियमशास्त्र हेच सांगत नाही काय?

[९]कारण, मोशेच्या नियमशास्त्रात लिहिले आहे की, 'मळणी करीत असलेल्या बैलाला मुसके घालू नको.' देव बैलांची काळजी करतो काय? [१०]किंवा सर्वस्वी आपल्याकरता तो हे म्हणतो? हे निःसंशय आपल्याकरता लिहिले आहे. म्हणजे जो नांगरतो त्याने आशेने नांगरावे, आणि जो मळणी करतो त्याने आपण वाटेकरी होऊ ह्या आशेने करावी. [११]आम्ही तुमच्यात जर आत्मिक गोष्टी पेरल्या आहेत, तर तुमच्या दैहिक गोष्टींची कापणी केल्यास त्यात मोठे काय आहे? [१२]दुसरे तुमच्यावरील ह्या हक्कात जर वाटेकरी होतात, तर आम्ही विशेषेकरून का होऊ नये? आणि तरी आम्ही ह्या हक्काचा उपयोग केला नाही, पण ख्रिस्ताच्या सुवार्तेला आम्ही अडखळण करू नये म्हणून, आम्ही सर्व गोष्टी सहन करतो.

[१३]जे मंदिराची सेवा करतात ते मंदिरातील अन्न खातात आणि जे वेदीपुढे उभे राहतात ते वेदीचे भागीदार होतात, हे तुम्ही जाणत नाही काय? [१४]प्रभूने त्याचप्रमाणे आज्ञा दिली आहे की, जे सुवार्तेची घोषणा करतात त्यांचा सुवार्तेवर निर्वाह व्हावा, [१५]पण ह्यातील कोणत्याच गोष्टीचा मी कधी उपयोग केला नाही, किंवा माझ्यासाठी तसे करावे म्हणून मी ह्या गोष्टी लिहिल्या नाहीत. कारण हे माझे अभिमान मिरवणे कोणी निरर्थक करण्यापेक्षा मला मरणे बरे वाटेल.

[१६]कारण मी जरी सुवार्ता सांगतो, तरी अभिमान मिरवण्यास मला कारण नाही. कारण माझ्यावर निकड घातली गेली आहे; मी सुवार्ता सांगणार नाही, तर मला हळहळ होईल. [१७]कारण, मी हे स्वेच्छेने केले, तर मला वेतन मिळेल, पण माझ्या इच्छेविरुद्ध असेल, तर माझ्यावर हा कारभार सोपविला गेला आहे. [१८]तर मग माझे वेतन काय? एवढेच की, मी सुवार्ता सांगतो, तेव्हा मी सुवार्ता फुकट पुरवावी आणि सुवार्तेविषयीच्या माझ्या हक्काचा मी दुरुपयोग करू नये.

[१९]कारण मी सर्वांपासून स्वतंत्र असलो तरी अधिक मिळवावेत म्हणून मी सर्वांचा दास झालो. [२०]मी यहुद्यांना मिळविण्यास, यहुद्यांना यहुद्यासारखा झालो; मी नियमशास्त्राधीन नसलो तरी मी नियमशास्त्राधीन असलेले मिळविण्यास, नियमशास्त्राधीन असलेल्यांना नियमशास्त्राधीन असल्यासारखा झालो. [२१](मी देवाच्या नियमाबाहेर नाही, पण ख्रिस्ताच्या नियमाखाली असल्यामुळे) मी नियमशास्त्राधीन नसलेले मिळविण्यास, नियमशास्त्राधीन नसलेल्यांना नियमशास्त्राधीन नसल्यासारखा झालो. [२२]आणि मी दुर्बळ असलेले मिळविण्यास, दुर्बळांना दुर्बळासारखा झालो. मी सर्वांना सर्व झालो आहे, म्हणजे सर्व काही करून मी काहींचे तारण करावे. [२३]आणि मी हे सुवार्तेकरता करतो, म्हणजे मीही तिच्यात सहयोगी व्हावे.

[२४]शर्यतीत धावणारे सगळेच धावतात पण
एकालाच बक्षीस मिळते, हे तुम्ही जाणत नाही काय?
म्हणून असे धावा की, तुम्ही मिळवाल. [२५]स्पर्धेसाठी
मेहनत करणारा प्रत्येक मनुष्य प्रत्येक गोष्टीत संयमन
करतो. ते नाशवंत हार मिळविण्यासाठी करतात, पण
आपण अविनाशी हार मिळवण्यासाठी करतो.

[२६]म्हणून तसा मी धावतो, निरर्थक नाही, मी तसे
मुष्टिप्रहार करतो, हवेवर प्रहार करणाऱ्यासारखे नाही.
[२७]पण मी माझे शरीर दाबाखाली दास्यात ठेवतो; नाहीतर,
दुसऱ्यांना घोषणा केल्यावर मी स्वतः, काही कारणाने,
कसोटीस न उतरलेला होईन.

१० शिवाय बंधूंनो, मी इच्छीत नाही की,
तुम्ही ह्या गोष्टींविषयी अज्ञानी असावे; आमचे
सगळे पूर्वज ढगाखाली होते आणि सगळे समुद्रातून पार
गेले. [२]आणि सगळ्यांचा मोशेच्या ठायी त्या ढगात आणि
समुद्रात बाप्तिस्मा झाला. [३]ते सगळे एकच आत्मिक अन्न
खात होते, [४]आणि सगळे एकच आत्मिक पाणी पीत होते.
कारण ते त्यांच्या मागोमाग जाणाऱ्या आत्मिक खडकातून
पीत होते आणि तो खडक ख्रिस्त होता. [५]तरी त्यांच्यातील
बहुतेकांविषयी देव संतुष्ट नव्हता, आणि ते रानात टाकले
गेले.

[६]आता, आपल्याला उदाहरणे म्हणून ह्या गोष्टी
झाल्या, म्हणजे त्यांनी वाईट गोष्टींची इच्छा धरली तशी
आपण वाईट गोष्टींची इच्छा धरू नये. [७]त्यांच्यातले काही
जण मूर्तिपूजक होते तसे तुम्ही मूर्तिपूजक होऊ नका.
कारण असे लिहिले आहे की, ते लोक खायला प्यायला
बसले आणि पुन्हा नाचायला उठले. [८]त्यांच्यातल्या
काहींनी जारकर्म केले आणि ते एका दिवसात तेवीस हजार
पडले; तसे आपण जारकर्म करू नये. [९]त्यांच्यातल्या
काहींनी प्रभूची परीक्षा केली आणि ते सर्पांकडून नाश
पावले; तशी आपण प्रभूची परीक्षा करू नये.
[१०]त्यांच्यातल्या काहींनी कुरकुर केली आणि ते
संहारकाकडून नाश पावले. तुम्ही त्यांच्याप्रमाणे कुरकुर
करू नका.

[११]आता, ह्या सर्व गोष्टी त्यांच्यावर आल्या त्या
उदाहरणे होण्यासाठी आल्या. आणि युगांचे शेवट
ज्यांच्यावर आलेत असे जे आपण, त्या आपल्याकरता
बोधासाठी त्या लिहिलेल्या आहेत. [१२]म्हणून आपण उभे
आहोत असे ज्याला वाटते त्याने आपण पडू नये म्हणून
काळजी घ्यावी.

[१३]मनुष्यावर येणाऱ्या सर्वसाधारण परीक्षेपेक्षा
तुमच्यावर निराळी आलेली नाही; पण देव विश्वासू आहे
व तो तुमच्या शक्तीपलीकडे तुमची परीक्षा होऊ देणार
नाही, तर तुम्ही ती सहन करण्यास समर्थ व्हावे, म्हणून तो
परीक्षेबरोबर सुटकेचा मार्गही तयार करील.

[१४]ह्यासाठी, माझ्या प्रियांनो, मूर्तिपूजेपासून दूर
पळा. [१५]शहाण्यांशी बोलावे तसे मी बोलतो; मी म्हणतो
त्यावर तुम्ही सारासार विचार करा. [१६]ज्या आशीर्वादाच्या
प्याल्यावर आपण आशीर्वाद मागतो तो ख्रिस्ताच्या
रक्तात आपली सहभागिता आहे ना? जी भाकर आपण
मोडतो ती ख्रिस्ताच्या शरिरात आपली सहभागिता आहे
ना? [१७]आपण पुष्कळ जण आहोत तरी 'एक भाकर व
एक शरीर' असे आहोत; कारण आपण सर्व जण त्या एका
भाकरीचे वाटेकरी आहो. [१८]जे दैहिक दृष्ट्या इस्राएल
आहेत त्यांना पहा; जे लोक वेदीवरील अर्पणातून खातात
ते वेदीचे भागीदार नाहीत काय?

[१९]मग मी काय म्हणतो? मूर्तीला वाहिलेले काही
आहे काय? किंवा मूर्ती काही आहे काय? [२०]पण परजन
जी अर्पणे करतात ती ते भुतांना अर्पित करतात, देवाला
नाही; आणि तुम्ही भुतांचे भागीदार व्हावे अशी माझी
इच्छा नाही. [२१]तुम्ही प्रभूचा प्याला व भुतांचा प्याला पिऊ
शकणार नाही. तुम्ही प्रभूच्या मेजाचे आणि भुतांच्या
मेजाचे वाटेकरी होऊ शकणार नाही. [२२]आपण प्रभूला
ईर्ष्येस आणणार काय? आपण त्याच्याहून प्रबळ आहोत
काय?

[२३]मला सर्व गोष्टींची मोकळीक आहे, पण सर्व गोष्टी
हिताच्या नसतात; मला सर्व गोष्टींची मोकळीक आहे, पण
सर्व गोष्टी उभारीत नाहीत. [२४]कोणी आपले हित पाहू नये
पण दुसऱ्यांचे हित पहावे. [२५]जे काही दुकानांत विकले
जाते ते खा; आणि तुम्ही विवेकाखातर काही चौकशी
करू नका. [२६]कारण पृथ्वी व तिच्यात भरलेले सर्व काही
परमेश्वराचे आहे.

[२७]विश्वास न ठेवणाऱ्या लोकांतील कोणी तुम्हाला
आमंत्रण केले आणि तुम्हाला जावेसे वाटले, तर तुम्हाला
वाढले असेल ते खा आणि विवेकाखातर काही चौकशी
करू नका. [२८]पण हे मूर्तींना वाहिलेले आहे असे कोणी
तुम्हाला म्हटल्यास ज्याने ते सांगितले त्याच्याखातर

आणि विवेकाखातर ते खाऊ नका. २९मी तुझा स्वतःचा
विवेक म्हणत नाही, पण त्या दुसऱ्याचा; कारण माझ्या
स्वातंत्र्याला दुसऱ्याच्या विवेकाने दोष का द्यावा? ३०मी
जर उपकार मानून वाटेकरी झालो, तर मी ज्याबद्दल
उपकार मानतो त्याबद्दल माझी निंदा का व्हावी?

३१म्हणून तुम्ही खाता किंवा पिता, किंवा जे काही
करता ते सर्व देवाच्या गौरवासाठी करा.

३२यहुद्यांना, हेल्लेण्यांना किंवा देवाच्या मंडळीला
अडखळण न करणारे व्हा. ३३जसा मी सर्वांना सर्व गोष्टींत
संतोषवीत असतो, आणि त्यांचे तारण व्हावे म्हणून
माझ्या हिताचे होईल ते न पाहता, पुष्कळांच्या हिताचे
होईल ते पाहतो तसे तुम्हीही करा.

## ११

मी जसा ख्रिस्ताचे अनुकरण करणारा
आहे तसे तुम्ही माझे अनुकरण करणारे व्हा.

२आता, तुम्ही सर्व गोष्टींत माझी आठवण करता,
आणि मी तुम्हाला नेमून दिलेल्या प्रथा पाळता, म्हणून मी
तुमची वाखाणणी करतो. ३पण माझी इच्छा आहे की,
तुम्हाला हे समजले पाहिजे: प्रत्येक पुरुषाचे मस्तक ख्रिस्त
आहे, स्त्रीचे मस्तक पुरुष आहे आणि ख्रिस्ताचे मस्तक
देव आहे. ४जो मस्तक आच्छादून प्रार्थना करतो, किंवा
संदेश देतो तो प्रत्येक मनुष्य आपल्या मस्तकाचा अपमान
करतो. ५पण जी मस्तकावर आच्छादन न घेता प्रार्थना
करते, किंवा संदेश देते ती प्रत्येक स्त्री आपल्या
मस्तकाचा अपमान करते; कारण ती मुंडण केल्याप्रमाणे
होते. ६कारण स्त्री जर पूर्ण आच्छादन घेत नसेल तर तिने
केसदेखील काढून टाकावेत; पण, केस काढून टाकणे
किंवा मुंडण करणे हे जर स्त्रीला लाजिरवाणे असेल तर
तिने पूर्ण आच्छादन घ्यावे. ७कारण, पुरुषाने, खरोखर,
मस्तक आच्छादू नये; कारण तो देवाचे प्रतिरूप आणि
गौरव आहे; पण स्त्री पुरुषाचे गौरव आहे. ८कारण
स्त्रीपासून पुरुष नाही; पण पुरुषापासून स्त्री आहे.
९त्याचप्रमाणे, पुरुष स्त्रीसाठी केला गेला नाही; पण
पुरुषासाठी स्त्री केली गेली. १०म्हणून स्त्रीने देवदूतांकरता
आपल्या मस्तकावर आपल्या हक्काचे चिन्ह ठेवावे.

११तरी प्रभूमध्ये स्त्रीशिवाय पुरुष नाही, आणि
पुरुषाशिवाय स्त्री नाही; १२कारण जशी स्त्री पुरुषापासून
आहे, तसाच पुरुषही स्त्रीपासून आहे, पण सर्व गोष्टी
देवाकडून आहेत. १३तुम्हीच सारासार विचार करा. स्त्रीने
मस्तकावर आच्छादन न घेता देवाची प्रार्थना करणे तिला
शोभते काय? १४जर पुरुषाला लांब केस असतील तर ते
त्याला लाजिरवाणे आहे, हे निसर्गही तुम्हाला शिकवीत
नाही काय? १५पण स्त्रीला लांब केस असतील तर त्यात
तिचे गौरव आहे, कारण तिला तिचे केस आच्छादन
म्हणून दिलेले आहेत. १६पण, जर कोणी कलहप्रेमी दिसत
असेल, तर आपल्यात तशी रीत नाही आणि देवाच्या
मंडळ्यांतही नाही.

१७आता तुम्हाला आज्ञा देत असता मी तुमची
वाखाणणी करीत नाही, कारण तुमचे एकत्र येणे हिताचे
होत नसून हानीचे होत आहे. १८कारण, सर्वांत प्रथम हे
की, तुम्ही मंडळीत एकत्र येता तेव्हा तुमच्यात विभाग
असतात, असे मी ऐकतो आणि काही अंशी खरे मानतो.
१९कारण तुमच्यात गटही असले पाहिजेत, म्हणजे
तुमच्यात जे पारखलेले आहेत ते तुमच्यात प्रगट व्हावेत.
२०म्हणून तुम्ही एकत्र जमता तेव्हा प्रभूचे भोजन घ्यायला
जमत नाही. २१कारण भोजन करतेवेळी प्रत्येक मनुष्य
दुसऱ्याच्या अगोदर आपले स्वतःचे भोजन घेतो; आणि
एक जण भुकेला असतो तर दुसरा प्यालेला असतो.
२२काय? तुम्हाला खायला प्यायला घरे नाहीत काय?
की, तुम्ही देवाच्या मंडळीचा अवमान करून
ज्यांच्याजवळ काही नाही त्यांना लाजवता? मी तुम्हाला
काय म्हणू? ह्यात मी तुमची वाखाणणी करू काय? मी
वाखाणणी करीत नाही.

२३कारण प्रभूकडून जे मला मिळाले तेच मी तुम्हाला
सांगून दिले की, प्रभू येशू धरून दिला गेला त्या रात्री त्याने
भाकर घेतली, २४आणि उपकार मानल्यावर ती मोडून
म्हटले, 'घ्या, खा, हे माझं शरीर आहे; हे तुमच्यासाठी
मोडलं जात आहे; माझ्या स्मरणार्थ हे करा.'
२५त्याचप्रमाणे भोजन झाल्यावर प्याला घेऊन म्हटले, 'हा
प्याला माझ्या रक्तात नवा करार आहे; तुम्ही हा जितक्या
वेळा पिता तितक्या वेळा माझ्या स्मरणार्थ करा.'

२६कारण तुम्ही जितक्या वेळा ही भाकर खाता,
आणि हा प्याला पिता तितक्या वेळा, तुम्ही प्रभूच्या
येण्यापर्यंत त्याच्या मरणाची घोषणा करता.

२७म्हणून जो कोणी अयोग्य प्रकारे ही भाकर खाईल,
आणि प्रभूचा प्याला पिईल, तो प्रभूच्या शरिराविषयी व
रक्ताविषयी दोषी होईल. २८पण माणसाने स्वतःची परीक्षा

करावी आणि मग त्याने ह्या भाकरीतून खावे आणि
प्याल्यातून प्यावे. २९कारण, ते शरीर न ओळखता जो
खातो आणि पितो तो स्वतःसाठी शिक्षाच खातो आणि
पितो.

३०ह्या कारणामुळे तुमच्यात पुष्कळ जण दुर्बळ व
दुखणेकरी झाले आहेत, आणि पुष्कळ निजले आहेत.
३१पण आपण स्वतःची पारख केल्यास आपल्यावर दोष
येऊ नये; ३२पण जेव्हा आपल्यावर दोष येतो तेव्हा प्रभू
आपल्याला शिक्षा करतो, म्हणजे आपण जगाबरोबर दोषी
ठरविले जाऊ नये.

३३म्हणून, माझ्या बंधूंनो, तुम्ही भोजन करण्यास
एकत्र येता तेव्हा एकमेकांसाठी थांबा. ३४जर कोणी
भुकेला असेल तर त्याने घरी खावे; म्हणजे तुम्ही स्वतःवर
दोष आणण्यास एकत्र येऊ नये. आणि मी स्वतः येईन
तेव्हा बाकीच्या गोष्टी व्यवस्थित करीन.

## १२

आता आत्मिक दानांविषयी, बंधूंनो,
मी इच्छीत नाही की, तुम्हाला अज्ञानी राहू
द्यावे. २तुम्ही जाणता की, जेव्हा तुम्ही परजन होता, तेव्हा
जसे चालविले जात होता तसे तुम्ही ह्या मुक्या मूर्तींकडे
नेले जात होता. ३म्हणून मी तुम्हाला विदित करतो की,
देवाच्या आत्म्याच्या प्रेरणेने बोलणारा कोणीही मनुष्य
येशूला शापित म्हणत नाही. ४आणि कोणीही मनुष्य पवित्र
आत्म्याच्या प्रेरणेशिवाय 'येशू प्रभू आहे' असे म्हणू शकत
नाही.

५आता कृपादानांचे प्रकार आहेत पण आत्मा एकच
आहे. तसेच सेवांचे प्रकार आहेत पण प्रभू एकच आहे.
६आणि कार्यांचे प्रकार आहेत, पण सर्वांत सर्व कार्य करतो
तो देव एकच आहे. ७पण आत्म्याचे प्रकटीकरण हे सर्वांस
उपयोगी होण्यास एकेकाला दिले जाते. ८कारण एकाला
आत्म्याच्या द्वारे ज्ञानीपणाचे बोलणे, आणखी एकाला
त्याच आत्म्याच्या इच्छेप्रमाणे ज्ञानाचे बोलणे दिले जाते.
९दुसऱ्याला त्याच आत्म्याच्या योगे विश्वास, आणखी
एकाला त्याच आत्म्याच्या योगे रोग काढण्याची कृपादाने,
१०आणखी एकाला चमत्कार करणे, आणखी एकाला
संदेश देणे, आणखी एकाला आत्मे ओळखणे, आणखी
एकाला विविध प्रकारच्या भाषा येणे, आणखी एकाला
भाषांचा अर्थ सांगता येणे. ११पण ह्या सर्वांत तोच एक
आत्मा कार्य करतो. तो आपल्या इच्छेप्रमाणे प्रत्येक
जणाला वाटून देतो.

१२कारण शरीर ज्याप्रमाणे एक असून त्याचे
अवयव पुष्कळ असतात, आणि एका शरिराचे अवयव
पुष्कळ असून एक शरीर असे असतात त्याप्रमाणेच
ख्रिस्त आहे. १३कारण आपण यहुदी किंवा हेल्लेणी होतो,
दास किंवा स्वतंत्र होतो तरी आपला एका आत्म्याने एका
शरिरात बाप्तिस्मा झाला आणि सर्वांना एकाच आत्म्याने
प्यायला दिले. १४कारण शरीर हे एक अवयव नसून
पुष्कळ अवयव मिळून एक आहे. १५जर पाय म्हणेल, 'मी
हात नाही म्हणून शरिराचा नाही', तर त्यावरून तो
शरिराचा नाही असे नाही. १६आणि कान म्हणेल, 'मी
डोळा नाही म्हणून शरिराचा नाही', तर त्यावरून तो
शरिराचा नाही असे नाही. १७सर्व शरीर डोळा असते तर
ऐकणे कुठे असते? आणि सर्व ऐकणे असते तर वास घेणे
कुठे असते?

१८पण, त्यांतले एकेक असे अवयव देवाला बरे
वाटल्याप्रमाणे त्याने शरिरात ठेवले. १९ते सगळे मिळून
एक अवयव असते, तर शरीर कुठे असते? २०पण, आता
पुष्कळ अवयव आहेत तरी एक शरीर असे आहेत,
२१आणि डोळा हाताला म्हणू शकणार नाही की, 'मला
तुझी गरज नाही', तसेच डोके पायांना म्हणू शकणार नाही
की, 'मला तुमची गरज नाही'. २२तर उलट, शरिराचे जे
अवयव अधिक अशक्त दिसतात ते आवश्यक आहेत.
२३आणि शरिराचे जे भाग आपण कमी मानाचे मानतो
त्यांना पुष्कळ अधिक मानाचे आवरण घालतो, आणि
आपल्या कुरूप भागांना पुष्कळ अधिक रूप लाभते.
२४कारण आपल्या शोभून दिसणाऱ्या अवयवांना गरज
नाही; पण ज्या भागांना गरज आहे त्यांना पुष्कळ अधिक
मान देऊन देवाने शरीर जुळविले आहे. २५म्हणजे शरिरात
दुही नसावी तर अवयवांनी एकमेकांची सारखीच काळजी
करावी.

२६आणि एक अवयव सोशीत असला तर
त्याच्याबरोबर सर्व अवयव सोसतात आणि एका
अवयवाचा मान झाला तर त्याच्याबरोबर सर्व अवयव
आनंद करतात.

२७आता, तुम्ही ख्रिस्ताचे शरीर आहा, आणि
व्यक्तिशः अवयव आहा. २८आणि देवाने मंडळीत असे
काही नेमले आहेत: प्रथम प्रेषित, दुसरे संदेष्टे, तिसरे

शिक्षक; त्यानंतर चमत्कार, त्यानंतर रोग काढण्याची कृपादाने, सहायक सेवा, व्यवस्था आणि विविध प्रकारच्या भाषा. [२९]सगळेच प्रेषित आहेत काय? सगळेच संदेष्टे आहेत काय? सगळेच शिक्षक आहेत काय? सगळेच चमत्कार करणारे आहेत काय? [३०]सगळ्यांनाच रोग काढण्याची कृपादाने मिळालीत काय? सगळेच अन्य भाषा बोलतात काय? सगळेच अर्थ सांगतात काय?

[३१]पण तुम्ही अधिक मोठी कृपादाने मिळवण्याची इच्छा बाळगा; आणि शिवाय, मी तुम्हाला एक अधिक चांगला मार्ग दाखवतो.

१३ मी मनुष्यांच्या आणि देवदूतांच्या भाषांत बोललो पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मी वाजणारी थाळी किंवा झणझणणारी झांज झालो. [२]आणि माझ्यात संदेश देण्याची शक्ती असली, मला सर्व रहस्ये कळली व सर्व ज्ञान अवगत झाले, आणि, मला डोंगर ढळवता येतील इतका माझ्यात पूर्ण विश्वास असला, पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मी काही नाही. [३]आणि माझी सर्व मालमत्ता मी गरिबांना अन्नदान करण्यास दिली व माझे शरीर जाळण्यास दिले पण माझ्या ठायी प्रीती नसली तर मला काही लाभ होत नाही.

[४]प्रीती सहनशील आहे, उपकारशील आहे, प्रीती हेवा करीत नाही; प्रीती बढाई करीत नाही, फुगत नाही. [५]अनुचितपणे वागत नाही, स्वहित पहात नाही, चिडत नाही, अपकार गणीत नाही. [६]अनीतीत आनंद करीत नाही, पण सत्याबरोबर आनंद करते. [७]सर्व गोष्टी सहन करते, सर्व गोष्टींवर विश्वास ठेवते, सर्व गोष्टींची आशा करते, सर्व गोष्टी सोसते.

[८]प्रीती कधीच ढळत नाही; संदेश असतील ते निरुपयोगी होतील, भाषा असतील त्या नाहीशा होतील, ज्ञान असेल ते नाहीसे होईल; [९]कारण आपण अंशतः जाणतो, आणि अंशतः संदेश देतो. [१०]पण जे पूर्ण आहे ते येईल, तेव्हा अपूर्ण आहे ते नाहीसे होईल.

[११]मी मूल होतो तेव्हा मुलाप्रमाणे बोलत असे, मुलाप्रमाणे समजत असे, मुलाप्रमाणे विचार करीत असे. पण मी आता प्रौढ झाल्यावर मुलाच्या गोष्टी सोडल्या आहेत. [१२]कारण आता, आपण आरशात अस्पष्ट पाहतो, पण तेव्हा तोंडोतोंड पाहू. आता मला अंशतः समजते, पण आता जसा मी ज्ञात आहे तसे तेव्हा मला ज्ञान होईल.

[१३]आता, विश्वास, आशा, आणि प्रीती ह्या तीन गोष्टी राहतात. पण ह्यांत प्रीती श्रेष्ठ आहे.

१४ तुम्ही प्रीतीच्या मागे लागा, आणि आत्मिक दानांची इच्छा बाळगा पण आपल्याला संदेश देता येतील ह्याची विशेष इच्छा बाळगा. [२]कारण जो अज्ञात भाषेत बोलतो तो मनुष्यांशी नव्हे पण देवाशी बोलतो; कारण ते कोणाला समजत नाही, पण तो आत्म्यात गूढ गोष्टी बोलतो. [३]पण जो संदेश देतो तो लोकांशी उभारणीसाठी, उत्तेजनासाठी व सांत्वनासाठी बोलतो. [४]जो अज्ञात भाषेत बोलतो तो आपली स्वतःची उभारणी करतो पण जो संदेश देतो तो मंडळीची उभारणी करतो.

[५]तुम्ही सर्वांनी अन्य भाषांत बोलावे, पण विशेषतः तुम्ही संदेश द्यावेत अशी माझी इच्छा आहे. कारण जो कोणी अन्य भाषांत बोलतो, पण मंडळीची उभारणी व्हावी म्हणून अर्थ सांगत नाही त्याच्यापेक्षा जो संदेश देतो तो मोठा आहे. [६]आता बंधूंनो, मी जर तुमच्याकडे अन्य भाषांत बोलत आलो, तर मी तुमच्याशी प्रकटीकरणाद्वारे, ज्ञानाद्वारे, संदेशाद्वारे किंवा शिक्षणाद्वारे बोलल्याशिवाय तुम्हाला मी काय लाभ घडवणार? [७]आणि, सनई किंवा वीणा ह्यांसारख्या, आवाज देणाऱ्या, निर्जीव वस्तूंनी वेगवेगळे आवाज दिले नाहीत तर सनई किंवा वीणा वाजवून काय वाजविले ते कसे कळेल? [८]आणि, जर कर्ण्याने अनिश्चित आवाज दिला तर लढाईसाठी कोण आपली तयारी करील?

[९]तसेच तुम्हीही तुमच्या भाषेत जर सुबोध शब्द उच्चारले नाहीत, तर तुम्ही काय बोललात ते कसे कळेल? कारण तुम्ही हवेत बोलाल. [१०]जगात भाषांचे अनेक प्रकार आहेत पण एकही अर्थाशिवाय नाही. [११]म्हणून मला जर भाषेचा अर्थ समजत नसेल तर बोलणाऱ्याला मी बर्बर वाटेन, आणि बोलणारा मला बर्बर वाटेल.

[१२]तसेच तुम्हीही आत्मिक दानांविषयी आवेशी आहात, तर मंडळीच्या उभारणीसाठी आपण अधिकाधिक पात्र व्हावे म्हणून प्रयत्न करा. [१३]म्हणून जो अज्ञात भाषेत बोलतो त्याला अर्थ सांगता यावा म्हणून त्याने प्रार्थना करावी. [१४]कारण, मी एखाद्या अज्ञात भाषेत प्रार्थना केली तर माझा आत्मा प्रार्थना करतो, पण माझी बुद्धी निष्फळ होते.

१५मग काय? मी आत्म्याने प्रार्थना करीन व बुद्धीनेही
प्रार्थना करीन. मी आत्म्याने स्तुती गाईन व बुद्धीनेही स्तुती
गाईन. १६नाहीतर, तू जर आत्म्याने धन्यवाद गाशील तर
अशिक्षितांच्या जागेवर, तेथे बसलेला कोणी मनुष्य तुझे
उपकारस्मरण झाल्यावर 'आमेन' कसा म्हणेल? कारण तू
काय बोलतोस ते त्याला कळत नाही. १७कारण, खरोखर,
तू उपकार मानतोस हे चांगले आहे पण दुसऱ्याची उभारणी
होत नाही.

१८मी तुमच्यातील सर्वांपेक्षा अन्य भाषांत अधिक
बोलतो म्हणून मी देवाचे उपकार मानतो. १९पण मी
मंडळीत अज्ञात भाषेत दहा हजार शब्द बोलण्यापेक्षा,
दुसऱ्यांनाही शिकवावे म्हणून, मी माझ्या बुद्धीने पाच
शब्द बोलावे हे मला बरे वाटते.

२०बंधूंनो, समंजस वृत्तीत मुले होऊ नका, पण
कुवृत्तीत मुले व्हा आणि समंजस वृत्तीत प्रौढ व्हा.
२१नियमशास्त्रात लिहिले आहे की, 'मी परभाषा
बोलणाऱ्यांकडून आणि परक्यांच्या ओठांनी ह्या
लोकांबरोबर बोलेन, पण ते, तेवढ्यानेही, माझे ऐकणार
नाहीत, असे प्रभू म्हणतो.'

२२ह्याकरता अन्य भाषा ह्या विश्वास ठेवणाऱ्यांना
नाही, पण विश्वास न ठेवणाऱ्यांना चिन्ह म्हणून आहेत.
पण जे विश्वास ठेवणारे नाहीत त्यांच्यासाठी संदेश नसून
विश्वास ठेवणाऱ्यांसाठी आहे. २३म्हणून, जर सर्व मंडळी
एकत्र जमली आणि सर्व जण अन्य भाषांत बोलू लागले,
आणि, जर कोणी अशिक्षित किंवा विश्वास न ठेवणारे
आत आले, तर तुम्ही वेडे आहात असे ते म्हणणार नाहीत
काय? २४पण जर सर्वांनी संदेश दिले व कोणी विश्वास न
ठेवणारा किंवा अशिक्षित मनुष्य आत आला, तर
सर्वांकडून त्याचा दोष दाखविला जाऊन सर्वांकडून त्याची
पारख केली जाते, २५आणि त्यायोगे त्याच्या मनातील गुप्त
गोष्टी प्रगट होतात; आणि तो मनुष्य तोंडावर पालथा पडून
देवाला नमन करील, आणि, खरोखर, तुमच्यात देव आहे
हे तो सांगेल.

२६बंधूंनो, मग असे काय? तुम्ही जमता तेव्हा
प्रत्येकाजवळ एक स्तोत्र असते, एक बोध असतो, एक
प्रकटीकरण असते, एक अन्य भाषा असते, एक अर्थबोध
असतो. सर्व गोष्टी उभारणीसाठी केल्या जाऊ द्या.
२७कोणी अज्ञात भाषेत बोलणार असल्यास, दोघांनी
किंवा फार तर तिघांनी क्रम लावून बोलावे, आणि एकाने
अर्थ सांगावा. २८पण अर्थ सांगणारा कोणी नसेल तर त्याने
मंडळीत शांत रहावे; आणि स्वतःशी व देवाशी त्याने
बोलावे; २९त्याचप्रमाणे संदेष्ट्यांतील दोघांनी किंवा
तिघांनी तेथे बोलावे, आणि दुसऱ्यांनी विवेचन करावे.
३०जर बसलेल्या दुसऱ्याला काही प्रकट झाले, तर
पहिल्याने शांत रहावे. ३१कारण, सर्वांनी शिकावे म्हणून व
सर्वांचे सांत्वन व्हावे म्हणून, तुम्ही सर्व जण एकामागून
एक संदेश देऊ शकाल. ३२आणि संदेष्ट्यांचे आत्मे
संदेष्ट्यांच्या अधीन राहतात. ३३कारण देव गोंधळाचा देव
नाही, पण शांतीचा देव आहे.

पवित्र जनांच्या सर्व मंडळ्यांत जसे आढळते
त्याप्रमाणे, ३४स्त्रियांनी मंडळ्यांत शांत रहावे. त्यांना
बोलण्याची परवानगी नाही, पण त्यांनी आज्ञांकित रहावे;
नियमशास्त्रही तसेच सांगते. ३५आणि जर त्यांना काही
शिकण्याची इच्छा असेल तर त्यांनी घरी आपल्या पतीला
विचारावे; कारण स्त्रीने मंडळीत बोलणे लाजेचे आहे.

३६काय? देवाचे वचन तुमच्याकडून आले काय?
किंवा ते केवळ तुमच्याकडे आले काय?

३७जर कोणी स्वतःला संदेष्टा मानीत असेल किंवा
आत्मिक मानीत असेल, तर, मी तुम्हाला लिहीत आहे ती
प्रभूची आज्ञा आहे हे त्याने ओळखावे. ३८पण कोणी
उपेक्षा केल्यास त्याची उपेक्षा केली जाईल. ३९म्हणून
बंधूंनो, संदेश द्यायची इच्छा धरा, आणि अन्य भाषांत
बोलणाऱ्याला मना करू नका.

४०पण सर्व गोष्टी शोभतील अशा, आणि क्रम लावून
करा.

१५ शिवाय, बंधूंनो, मी जी सुवार्ता तुम्हाला
गाजविली, जी तुम्हीही स्वीकारली, आणि
ज्या सुवार्तेत तुम्ही स्थिर आहा ती मी तुम्हाला विदित
करतो. २मी ज्या वचनांत ती तुम्हाला गाजविली ती तुम्ही
बळकट धरली असल्यास तिच्या योगे तुमचे तारणही होत
आहे; नसल्यास तुम्ही व्यर्थ विश्वास ठेवलात.

३कारण जे मला मिळाले आणि मी तुम्हाला, सर्वांत
प्रथम, जे सांगून दिले, ते हे आहे की, शास्त्रलेखांत
लिहिल्याप्रमाणे आपल्या पापांकरता ख्रिस्त मेला, ४आणि
त्याला पुरले व शास्त्रलेखांत लिहिल्याप्रमाणे तो तिसऱ्या
दिवशी पुन्हा उठला. ५आणि तो केफाला दिसला, नंतर
बारा जणांना दिसला; ६त्यानंतर, एकाच वेळी, पाचशेहून
अधिक बंधूंना दिसला. त्यांच्यातले बहुतेक जण

आतापर्यंत राहिले आहेत, पण काही निजले आहेत.
[७]त्यानंतर याकोबाला दिसला; नंतर सर्व प्रेषितांना दिसला.
[८]आणि, जणू अकाली जन्मलेल्या मलाही तो सर्वांच्या
शेवटी दिसला.

[९]कारण मी प्रेषितांत इतका कनिष्ठ आहे की, मी प्रेषित
म्हटला जाण्यास योग्य नाही; कारण मी देवाच्या मंडळीचा
छळ केला. [१०]पण, मी आहे तो देवाच्या कृपेने आहे;
आणि माझ्यावरची त्याची कृपा व्यर्थ झाली नाही. पण
त्या सर्वांहून मी अधिक कष्ट केले; तरी मी नाही, पण
माझ्याबरोबर रहात असलेली देवाची कृपा ते करीत होती.
[११]मग मी काय, आणि ते काय, आम्ही अशी घोषणा
करतो, आणि तुम्ही असा विश्वास ठेवलात.

[१२]आता, ख्रिस्त मेलेल्यांतून उठला अशी जर घोषणा
केली जात आहे तर तुमच्यातले काही कसे म्हणतात की,
मेलेल्यांचे पुनरुत्थान नाही? [१३]पण जर मेलेल्यांचे
पुनरुत्थान नाही, तर ख्रिस्त उठला नाही. [१४]आणि जर
ख्रिस्त उठला नाही, तर आमची घोषणा व्यर्थ आहे आणि
तुमचा विश्वासही व्यर्थ आहे.

[१५]आणि आम्ही देवाचे खोटे साक्षी ठरलो; कारण,
देवाने ख्रिस्ताला उठवले अशी आम्ही त्याच्याविषयी साक्ष
दिली. जर हे असे असेल की, मेलेले उठवले जात नाहीत
तर त्याने त्याला उठवले नाही. [१६]कारण जर मेलेले उठत
नाहीत तर ख्रिस्त उठवला गेला नाही. [१७]आणि, जर
ख्रिस्त उठवला गेला नाही, तर तुमचा विश्वास व्यर्थ आहे
आणि तुम्ही अजून तुमच्या पापांत आहा. [१८]मग जे
ख्रिस्तात निजले आहेत त्यांचाही नाश झाला आहे.

[१९]आपण जर केवळ ह्याच आयुष्यात ख्रिस्तात
आशा करीत असलो तर आपण सर्व लोकांहून लाचार
आहोत. [२०]पण आता, ख्रिस्त मेलेल्यांतून उठला आहे,
आणि निजलेल्यांचे प्रथमफळ झाला आहे. [२१]कारण,
ज्याप्रमाणे मनुष्याद्वारे मरण आले, त्याप्रमाणे मनुष्याद्वारे
मेलेल्यांचे पुनरुत्थान आले.

[२२]कारण जसे आदामात सर्व मरतात तसे ख्रिस्तात
सर्व जिवंत केले जातात. [२३]पण प्रत्येक त्याच्या स्वतःच्या
क्रमाने; प्रथमफळ ख्रिस्त, त्यानंतर, जे ख्रिस्ताचे आहेत
ते, त्याच्या येण्याच्या वेळी.

[२४]मग त्याने सर्व सत्ता, सर्व शक्ती व बळ ही नष्ट
केल्यावर, तो देवपित्याला राज्य सोपवून देईल तेव्हा
शेवट येईल. [२५]कारण, तो त्याचे वैरी त्याच्या पायांखाली
ठेवील तोवर त्याला राज्य केले पाहिजे. [२६]जो शेवटचा
वैरी नष्ट केला जाईल तो मृत्यू होय. [२७]कारण त्याने,
त्याच्या पायांखाली, सर्व गोष्टी त्याच्या अंकित केल्या
आहेत. पण जेव्हा तो म्हणतो की, 'सर्व गोष्टी त्याच्या
अंकित केल्या आहेत', तेव्हा ज्याने सर्व गोष्टी त्याच्या
अंकित केल्या, तो स्वतः बाहेर आहे हे उघड आहे.
[२८]आणि, जेव्हा सर्व गोष्टी त्याला अंकित होतील तेव्हा
पुत्र स्वतः त्या सर्व गोष्टी आपल्या अंकित करणाऱ्याला
अंकित होईल. म्हणजे देव हाच सर्वांत सर्व असावा.

[२९]नाहीतर, जे लोक मेलेल्यांतून बाप्तिस्मा घेतात ते
काय साधतील? जर मेलेले उठविलेच जात नाहीत तर ते
लोक त्यांच्याबद्दल बाप्तिस्मा का घेतात? [३०]आणि प्रत्येक
घटकेस आम्हीही धोक्यात का असतो? [३१]बंधूंनो, ख्रिस्त
येशू आपला प्रभू ह्याच्या ठायी, मला तुमच्याविषयी
असलेल्या अभिमानाची शपथ घेऊन मी हे म्हणतो की,
मी रोज मरतो. [३२]जर, इफिसमध्ये मी इतरांप्रमाणे,
पशूंबरोबर लढलो असेन, तर माझा लाभ काय? जर
मेलेले उठत नाहीत, तर या, आपण खाऊ पिऊ, कारण
आपण उद्या मरणार.

[३३]फसू नका; वाईट संगती चांगल्या सवयी
बिघडवतात. [३४]नीतिमत्वासाठी पूर्ण सावध रहा; पाप करू
नका. कारण कित्येक देवाविषयी अज्ञानात आहेत. मी हे
तुम्हाला लाजवावे म्हणून बोलतो.

[३५]पण कोणी म्हणेल की, मेलेले कसे उठविले
जातात? आणि ते कोणत्या शरिराने येतात? [३६]अरे
निर्बुद्धी, तू जे पेरतोस ते मेले नाही, तर जिवंत केले जात
नाही. [३७]आणि तू जे पेरतोस ते उद्भवणारे अंग पेरीत
नाहीस, पण उघडा दाणा पेरतोस; तो गव्हाचा किंवा
दुसऱ्या कशाचा असेल. [३८]पण देवाला बरे वाटल्याप्रमाणे
तो त्याला अंग देतो; प्रत्येक दाण्याला त्याचे स्वतःचे अंग
देतो.

[३९]सर्व देह एकाच प्रकारचे देह नाहीत; पण मनुष्यांचा
देह निराळा, पशूंचा देह निराळा, पक्ष्यांचा देह निराळा,
तसाच माशांचाही निराळा. [४०]तशीच स्वर्गीय शरिरे आहेत
आणि पार्थिव शरिरेही आहेत; पण स्वर्गीयांचे तेज निराळे
व पार्थिवांचे तेज निराळे. [४१]सूर्याचे तेज निराळे आहे,
चंद्राचे तेज निराळे आहे, आणि ताऱ्यांचे तेज निराळे
आहे. कारण प्रत्येक तारा आपल्या तेजाने दुसऱ्या
ताऱ्याहून निराळा असतो.

[४२]तसेच मृतांचे पुनरुत्थान आहे. नाशात पेरले जाते,
अविनाशीपणात उठविले जाते. [४३]अपमानात पेरले जाते,

गौरवात उठविले जाते. अशक्तपणात पेरले जाते,
सामर्थ्यात उठविले जाते. [४४]जीवधारी शरीर पेरले जाते,
आत्मिक शरीर उठविले जाते. जर जीवधारी शरीर आहे
तर आत्मिक शरीरही आहे.
[४५]आणि, म्हणून असे लिहिले आहे की, 'पहिला
मनुष्य आदाम हा जगणारा जीव झाला'; शेवटला आदाम
हा जिवंत करणारा आत्मा झाला. [४६]तरी प्रथम आत्मिक
नव्हे, तर जीवधारी; त्यानंतर आत्मिक. [४७]पहिला मनुष्य
पृथ्वीवरचा, मातीचा आहे, दुसरा मनुष्य स्वर्गातला आहे.
[४८]जो मातीचा तो जसा होता तसेच जे मातीचे तेही आहेत,
आणि जो स्वर्गीय तो जसा आहे तसेच जे स्वर्गीय तेही
आहेत. [४९]आणि जो मातीचा होता त्याचे प्रतिरूप आपण
धारण केले, त्याचप्रमाणे जो स्वर्गीय आहे त्याचे प्रतिरूप
आपण धारण करू. [५०]आता बंधूंनो, मी हे सांगतो की,
मांस व रक्त ह्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळू शकत
नाही आणि विनाशीपणाला अविनाशीपणाचे वतन मिळत
नाही.
[५१-५२]बघा, मी तुम्हाला एक रहस्य सांगतो; आपण
सगळेच निजणार नाही, पण एका क्षणात, एका निमिषात,
शेवटचा कर्णा वाजेल तेव्हा आपण सगळेच पालटून
जाऊ. कारण कर्णा वाजेल आणि मेलेले अविनाशी असे
उठविले जातील व आपण सगळे पालटून जाऊ. [५३]कारण
हे जे विनाशी आहे त्याने अविनाशीपण परिधान करावे;
आणि हे जे मर्त्य आहे त्याने अमरपण परिधान करावे हे
आवश्यक आहे. [५४]म्हणून जे विनाशी आहे त्याने
अविनाशीपण परिधान केले, आणि जे मर्त्य आहे त्याने
अमरपण परिधान केले असे होईल, तेव्हा, 'मृत्यू विजयात
ग्रासला गेला', असे जे वचन लिहिले आहे ते पूर्ण होईल.
[५५]'अरे मृत्यू, तुझी नांगी कोठे? अरे मृत्यू, तुझा विजय
कोठे?' [५६]कारण मृत्यूची नांगी पाप, आणि पापाचे बळ
नियमशास्त्र आहे.
[५७]पण आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या द्वारे जो देव
आपल्याला विजय देतो त्याला धन्यवाद!
[५८]म्हणून, माझ्या प्रिय बंधूंनो, तुम्ही स्थिर, न
ढळणारे व प्रभूच्या कामात सदा सधन असे व्हा; कारण
प्रभूमध्ये तुमचे काम व्यर्थ नाही, हे तुम्ही जाणता.

१६ आता, पवित्र जनांकरता वर्गणी गोळा
करण्याविषयी, मी गलतियातील मंडळ्यांना
आज्ञा दिल्याप्रमाणे तुम्हीही करा.
[२]तुमच्यामधील प्रत्येकाने, त्याला यश मिळेल त्या
मानाने, दर आठवड्याच्या पहिल्या दिवशी जमवून
ठेवावे. म्हणजे, मी येईन तेव्हा वर्गण्या होऊ नयेत.
[३]आणि मी आल्यावर तुम्ही, पत्रे देऊन, ज्यांना पसंत
कराल त्यांना मी तुमची देणगी यरुशलेमला घेऊन जायला
पाठवीन; [४]आणि मीही जावे हे उचित असल्यास ते
माझ्याबरोबर जातील.

[५]मी मासेदोनियामधून जाईन तेव्हा, मी आता,
तुमच्याकडे येईन, कारण मी मासेदोनियामधून प्रवास
करणार आहे. [६]आणि शक्य झाल्यास मी तुमच्याबरोबर
राहीन आणि हिवाळाही घालवीन, म्हणजे मी जाणार
असेन तिकडे तुम्ही मला वाटेस लावावे. [७]कारण आता
ह्या प्रवासात तुम्हाला भेटावे अशी माझी इच्छा नाही; पण
मी आशा करतो की, मला प्रभूने मोकळीक दिल्यास मी
काही काळ तुमच्याबरोबर राहीन. [८]पण पन्नासाव्या
दिवसाच्या सणापर्यंत मी इफिसला राहीन. [९]कारण
माझ्याकरता एक मोठे व परिणामकारक दार उघडले गेले
आहे, आणि विरोध करणारे पुष्कळ आहेत.
[१०]आता जर तिमथ्य आला, तर असे पहा की,
त्याला तुमच्यात निर्भय होता येईल, कारण तो,
माझ्याप्रमाणेच प्रभूचे काम करीत आहे. [११]कोणी त्याचा
उपहास करू नये; पण त्याला माझ्याकडे येता यावे म्हणून
शांतीने वाटेस लावा. कारण मी येथील बांधवांबरोबर
त्याची प्रतीक्षा करीत आहे. [१२]पण बंधू अपुल्लोविषयी
असे आहे की, त्याने इतर बांधवांबरोबर तुमच्याकडे यावे,
अशी मी त्याला फार विनंती केली; पण त्याची आता
येण्याची मुळीच इच्छा नव्हती, पण त्याला सोयीची संधी
मिळेल तेव्हा तो येईल.
[१३]जागृत रहा, विश्वासात स्थिर रहा; पुरुषासारखे
रहा, बलवान व्हा. [१४]तुमचे सर्व काही प्रीतीने केले जावे.
[१५]आता बंधूंनो, स्तेफनाच्या घराण्याविषयी तुम्हाला
चांगली माहिती आहे. ते अखयातील प्रथमफळ आहे;
आणि पवित्र जनांच्या सेवेसाठी त्यांनी स्वतःला वाहिले
आहे. मी तुम्हाला विनंती करतो की, [१६]तुम्ही अशांच्या
आणि आमच्याबरोबर सहकार्य करणाऱ्या व श्रम
करणाऱ्या प्रत्येकाच्या अधीन रहा. [१७]स्तेफना, फर्तुनात व
अखाईक, ह्यांच्या येण्यामुळे मला आनंद झाला आहे.
तुमच्याकडून जे कमी झाले ते त्यांनी पुरे केले आहे.

[१८]कारण त्यांनी माझ्या आत्म्याला व तुमच्याही आत्म्याला स्वास्थ्य दिले आहे. म्हणून तुम्ही अशांची जाणीव ठेवा.

[१९]आसियामधील मंडळ्या तुम्हाला सलाम देतात. अक्विला आणि प्रिस्का व त्यांच्या घरात जमणारी मंडळी तुम्हाला प्रभूमध्ये फार सलाम कळवतात.
[२०]सर्व बंधू तुम्हाला सलाम देतात. पवित्र चुंबनाने एकमेकांना सलाम द्या.
[२१]माझा पौलाचा स्वहस्ते सलाम.
[२२]कोणी प्रीती करीत नसेल तर तो शापित असो. माराना था.

[२३]आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याची कृपा तुम्हाबरोबर असो.
[२४]ख्रिस्त येशूत माझी प्रीती तुम्हा सर्वांबरोबर असो. आमेन.